# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई- ९३**

**ईमेल :-** gmhrrecruitment@midcindia.org **दुरध्वनी क्रमांक :-** ०२२-४७४८८३१२/४६९९/४६७९


जा.क्र.मऔविम/साप्रवि/स.से.भ./पी-६७३२७६/२०२६ दिनांक : २३/०४/२०२६

सरळसेवा भरती - २०२३

(जाहिरात क्र. १/२०२३, दिनांक १४/०८/२०२३)

## सुचनापत्र

म.औ.वि.महामंडळातील सरळसेवा भरती २०२३ अंतर्गत गट - अ, गट-ब आणि गट-क अशा एकूण ३४ संवर्गातील ऑनलाईन स्पर्धा परीक्षा घेण्यात आलेल्या असून सदर परीक्षेमधील पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी महामंडळाच्या संकेतस्थळावर दि.०८/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. गुणवत्ता यादीमध्ये पात्र ठरलेल्या १९ संवर्गातील उमेदवारांची प्रारुप निवड व प्रतिक्षा यादी दि.१०/०२/२०२६ रोजी महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उक्त प्रारुप निवड / प्रतिक्षा यादीवर काही उमेदवारांनी आक्षेप / हरकती नोंदविल्या आहेत. सदर आक्षेप / हरकतीच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार प्रारुप निवड / प्रतिक्षा यादीमध्ये आवश्यक तो बदल करण्यात आला असून १९ संवर्गातील सहायक अभियंता (स्थापत्य), अनुरेखक व भूमापक या ३ संवर्गाच्या प्रारुप निवड / प्रतिक्षा यादीमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार ३ संवर्गामध्ये बदल करण्यात आलेल्या सुधारीत निवड / प्रतिक्षा यादी व उर्वरीत १६ संवर्गाच्या निवड / प्रतिक्षा यादी महामंडळाच्या संकेतस्थळावर पुन:श्च प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर पुन:श्च प्रसिध्द केलेल्या निवड व प्रतिक्षा यादीतील नमुद केलेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी दि.२९/०४/२०२६, दि. ३०/०४/२०२६, दि. ०४/०५/२०२६, दि. ०५/०५/२०२६, दि.०६/०५/२०२६, दि.०७/०५/२०२६ व दि. ०८/०५/२०२६ या कालावधीत उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई - ९३ या ठिकाणी घेण्यात येणार आहे. याबाबत कागदपत्रे पडताळणीची रुपरेषा व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रांची यादी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(प्रितीलता कौरथी)

**महाव्यवस्थापक (मबवि)**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**